**MLT**

**2010**

100088

**मराठी वाङ्मय - I ( वैकल्पिक )**

**स्तर : पदवी** **एकूण गुण : 200**

**स्वरूप : पारंपारिक** **कालावधी : ३ तास**

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1* ***हा अनिवार्य आहे.*** *उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थींकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

**1.** खालीलपैकी **कोणतेही चार उपप्रश्न** सोडवा. (प्रत्येकी 10 गुण)

(अ) प्रमाणभाषा व बोलीभाषा या संकल्पना स्पष्ट करा. **10**

(ब) ज्ञानभाषा म्हणून मराठीचे उपयोजन परिणामकारकतेने व्हावे, या दृष्टीने अडचणी व उपाय यांचा परामर्श घ्या. **10**

(क) 'नवसाहित्य'-निर्मितीच्या दृष्टीने सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचे विश्लेषण करा. **10**

(ड) गांधीवादी जीवनदृष्टीचा मराठी साहित्याशी असलेला संबंध निश्चित करा. **10**

(इ) वर्तमानपत्र या संपर्कमाध्यमाच्या भाषिक वैशिष्ट्यांची नोंद करा. **10**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - अ

2. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) भाषेची समाजसंबद्धता स्पष्ट करा. 10

(ब) 'स्वनिम' ही संकल्पना सोदाहरण विशद करा. 10

(क) मराठीतील अव्यय-प्रकारांच्या व्याख्या लिहा व उदाहरणे द्या. 10

(ड) मराठीतील भावे प्रयोग सोदाहरण स्पष्ट करा. 10

3. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) मराठी भाषेवरील अरबी-फारसीचा प्रभाव सोदाहरण मांडा. 10

(ब) यादव कालीन मराठी भाषेची वैशिष्ट्ये लिहा. 10

(क) मराठीतील विभक्ती प्रत्ययांची नोंद करा. 10

(ड) मराठीतील काळांच्या तीन प्रमुख प्रकारांचा सोदाहरण परिचय करून द्या. 10

www.mpscmaterial.com

## विभाग - ब

4. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) भाषांतराची आवश्यकता, स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा. 15

(ब) लोककथा म्हणजे काय? लोककथेचे प्रकार व वैशिष्ट्ये यांचा परिचय करून द्या. 15

(क) लोकसाहित्य-निर्मितीच्या प्रेरणा सोदाहरण स्पष्ट करा. 10

5. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) इलेक्ट्रॉनिक्स-संपर्कमाध्यमे कोणती? या माध्यमांत वापरल्या जाणाऱ्या भाषेची वैशिष्ट्ये विशद करा. 15

(ब) लोकनाट्य म्हणजे काय? परंपरागत लोकनाट्य प्रकारांचा सविस्तर परिचय करून द्या. 15

(क) लोकसाहित्य आणि मौखिक परंपरा यांच्यातील संबंधाची चिकित्सा करा. 10

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - क

6. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) पेशवेकालीन बखरींचा परामर्श घ्या. 10

(ब) संत वाङ्मयाच्या प्रेरणा व प्रवृत्तींचा सोदाहरण आढावा घ्या. 10

(क) दलित साहित्य म्हणजे काय ? दलित साहित्यनिर्मितीची कारणे विशद करा. 10

(ड) केशवसुतांनी मराठी कवितेत केलेल्या क्रांतीचे स्वरूप स्पष्ट करा. 10

7. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) महानुभाव पंथाच्या 'साती ग्रंथां'चा परिचय करून द्या. 10

(ब) बखर-लेखनशैलीचा सोदाहरण परामर्श घ्या. 10

(क) स्त्रीवादी साहित्यनिर्मितीची कालिक पार्श्वभूमी विशद करा. 10

(ड) स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरी या साहित्यप्रकाराच्या ऐतिहासिक वाटचालीचा सूत्ररूप आढावा घ्या. 10

## विभाग - ड

8. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) समीक्षा म्हणजे काय ? समीक्षेचे स्वरूप व प्रयोजन स्पष्ट करा. 10

(ब) साहित्याच्या मूल्यमापनाच्या निकषांची चर्चा करा. 10

(क) भारतीय साहित्यविचारातील 'ध्वनी' ही संकल्पना स्पष्ट करा. 10

(ड) ॲरिस्टॉटलचा 'अनुकृती-सिद्धांत' सूत्ररूपाने मांडा. 10

9. खालील उपप्रश्न सोडवा.

(अ) साहित्याच्या भाषेचे वेगळेपण सोदाहरण विशद करा. 10

(ब) तुलनात्मक समीक्षापद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा. 10

(क) कुंतकाने सांगितलेल्या वक्रोक्तीच्या प्रकारांचा परामर्श घ्या. 10

(ड) इप्पोलित तेन या फ्रेंच विद्वानाच्या त्रिसूत्री सिद्धांताचे स्वरूप विशद करा. 10

-o0o-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial